**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १० डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यात सर्व इलेक्ट्रिक वाहनांना शासनाने जाहीर केलेली टोलमाफी येत्या आठ दिवसात लागू करण्यात यावी - अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे विधान सभेत निर्देश**

2. **विधिमंडळ अधिवेशनाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी अनेक मोर्च्यांनी वेधले लक्ष**

3. **गडचिरोलीत ११ नक्षलवाद्यांचे पोलिस महासंचालकांपुढे आत्मसमर्पण**

4. **नागपूरसह पूर्व विदर्भाच्या अनेक जिल्ह्यात आज थंडीच्या लाटेचा इशारा**

---------------------------------

**विधानसभा**

नुकत्याच झालेल्या नगरपंचायती आणि नगरपरिषदेच्या निवडणुकांमध्ये काही प्रभागातील आणि काही ठिकाणी नगराध्यक्ष पदासाठीच्या निवडणुका पुढं ढकलण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या कृतीला बेकायदेशीर ठरवून राज्यघटनेच्या कलम 243 (क) नुसार राज्य निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करण्याची मागणी, काँग्रेस नेते नाना पटोले यांनी आज विधानसभेत केली. त्यावर राज्यघटनेतील कलम 123 आणि 124 नुसार अशा प्रकारची कारवाई सभागृहाला करता येत नाही, असं उत्तर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलं.

ऐकूया विधानसभेतील कार्यवाहीचा सविस्तर वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून -

***(व्हॉइस कास्ट - नम्रता फलके )***

***राज्यात सर्व इलेक्ट्रिक वाहनांना टोल माफ करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी येत्या आठ दिवसात करावी आणि निर्णय लागू केल्यापासून आजपर्यंत वसूल झालेली टोल रक्कम परत करावी, असे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत दिले. सर्व संबंधित टोल नाक्यांवर टोल न घेण्याच्या सूचना आठ दिवसात देण्यात याव्यात. अशा वाहनांसाठी राज्यभर चार्जिंग स्टेशन वाढवा आणि त्यांच्या क्षमतेत देखील वाढ करा, अशा सूचना अध्यक्षांनी यावेळी दिल्या. याबाबतचा प्रश्न शंकर जगताप यांनी***

*उपस्थित केला होता. त्यावर वरुण सरदेसाई यांनी उपप्रश्न विचारले.राज्यात एफ.एल-2 आणि सी.एल-3 परवानाधारक विदेशी आणि देशी दारू किरकोळ विक्री केंद्रांच्या स्थलांतरासाठी नोंदणीकृत सोसायटीची एनओसी अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री आणि उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. सदस्य शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.२०२१ ते २०२३ या काळात रेबीजमुळे ३० जणांना आपले प्राण गमवावे लागले, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिली. एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात शिंदे म्हणाले की, स्थानिक पातळीवरच्या संबंधित संस्थांना श्वानांचं निर्बिजीकरण आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. मुंबई, पुणे, नागपूर, कल्याण-डोंबिवलीसारख्या प्रमुख शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त करताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील प्रभू यांनी प्रश्न विचारला होता.विधानसभेत आज लाडकी बहीण योजनेवर चर्चा झाली. काँग्रेस नेते नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी या योजनेतील बोगस लाभार्थ्यांकडे सभागृहाचं लक्ष वेधलं. लाडकी बहीण योजनेची केवायसी प्रक्रिया सुरू असून बोगस लाभार्थी शोधून योग्य ती कारवाई केली जाईल, असं मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितलं. आजवर दोन कोटी 43 लाख बहिणींचं रजिस्ट्रेशन या योजनेसाठी झालं असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली. राज्यातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संदर्भात सुरक्षा उपाययोजना न पाळणाऱ्या उद्योगांवर खटले दाखल केले जातील. कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने न देणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाई केली जाईल तसेच विनापरवाना युनिट्सकरिता 'स्पेशल ड्राईव्ह' घेण्यात येईल, अशी माहिती कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी लक्षवेधी उत्तरात दिली. विधानसभा सदस्य शंकर जगताप, अर्जुन खोतकर, बाबाजी काळे यांनी पुणे जिल्ह्यातील भोसरी येथे एका कंपनीमध्ये स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेसंदर्भात प्रश्न विचारला होता.*

*आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी नम्रता फलके*

---------------------------------

**विधान परिषद**

विधानपरिषदेतील प्रश्नोत्तराच्या तासात ओबीसी समाजाच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या 18 नव्या महामंडळांच्या कार्यान्वयन आणि निधीच्या उपलब्धतेवर चर्चा झाली. 2024 मध्ये या महामंडळांची स्थापना झाल्यानंतर प्रत्येकी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्याचं सरकारनं आश्वासन दिलं होतं. परंतु प्रत्यक्षात

केवळ दोन कोटी रुपये देण्यात आल्याचं निदर्शनास आणत परिणय फुके यांनी सरकारला प्रश्न विचारला. त्यावर उत्तर देताना मंत्री अतुल सावे यांनी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी महामंडळ आणि त्याच्या 18 उपकंपन्या स्थापन झाल्याचं सांगितलं. या संपूर्ण संरचनेसाठी प्रारंभी 15 कोटी आणि नंतर 65 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी 9 कोटी वितरीत झाले आहेत आणि 50 कोटी रुपयांची प्रक्रिया सुरू आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर या योजना राबवण्यात आल्या असून 29 हजार लोकांना कर्जाचे लाभ देण्यात आल्याचं मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी सांगितलं. लक्ष्यित घटकांमध्ये जागृती वाढत असून समाजापर्यंत योजना व्यापक प्रमाणात पोहोचवण्यासाठी अधिक प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी नमूद केलं.अकोला जिल्ह्यातील पारस औष्णिक विद्युत केंद्रामार्फत बांधण्यात आलेल्या रस्त्याच्या बांधकामातील खर्च आणि निकृष्ट कामाच्या आरोपांवर आज चर्चा झाली आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांकडून भ्रष्टाचाराचा संशय व्यक्त करण्यात आला. त्यावर उत्तरादाखल राज्यमंत्री मेघना साकोरे बोराडेकर यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करणार असल्याचं आश्वासन दिलं.

---------------------------------

**एड. आशिष जयस्वाल**

महाविकास आघाडी मधील घटक पक्षांमध्ये विरोधी पक्षनेते पदाच्या बाबतीत मतभेद आहेत. त्यांच्यात समन्वयाचा अभाव आहे. त्यामुळे त्यांनी विरोधी पक्षनेते पदाचा आग्रह सोडून जनतेच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करावं आणि जनतेचे मुद्दे सभागृहात मांडावेत, असं प्रतिपादन राज्यमंत्री एडवोकेट आशिष जयस्वाल यांनी केलं. आज विधिमंडळ परिसरात त्यांनी पत्रकारांशी वेगवेगळ्या मुद्द्यांवर संवाद साधला.

---------------------------------

**मोर्चाबांधणी**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा आज तिसरा दिवस आहे. समाजातील अनेक गट आपल्या विविध मागण्यांसह नागपुरात आज दाखल झाले. महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलीस पाटील संघ तसेच पोलीस पाटील असोसिएशन संघटना यांसारख्या राज्यभरातील अनेक संघटनांनी आज नागपुरात मोर्चा काढला. त्याचप्रमाणे आयटक, आशा, अंगणवाडी, बांधकाम, शालेय पोषण, उमेद, ग्रामरोजगार सेवक आणि इतर संघटनांनी संयुक्तपणे नागपुरात मोर्चा काढला असून झिरो माइल परिसरात ठिय्या आंदोलन केलं. सर्वांना वेतन आणि निवृत्तीवेतन यासोबतच विविध मागण्यांच्या संदर्भात हा मोर्चा काढण्यात आला. याशिवाय समता सैनिक दल नागपूर, दलित

महासंघ सातारा, जागृती मोलकरणी संघर्ष समिती, प्रतिष्ठित कलावंत प्रतिष्ठान अकोला, महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळ, सकल मातंग समाज जालना अशा विविध संघटनांनी आपल्या विविध मागण्यांसाठी यशवंत स्टेडियम इथं धरणे आंदोलन केलं.

---------------------------------

**राज्य मंत्रिमंडळ बैठक**

नागपूर - चंद्रपूर शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग अंतर्गत केंद्र शासनाच्या गतीशक्ती पोर्टलकडून प्राप्त सूचनांचा विचार करून एकूण 204 किलोमीटर लांबीच्या सुधारित रस्ता आखणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. नागरीकरणाचा वेग वाढता असल्यामुळे शहरांमध्ये निर्माण होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यास शासनाचं प्राधान्य असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले

---------------------------------

**विजय वडेट्टीवार**

विधिमंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्याबरोबरच सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचं लोकलेखा समितीचे अध्यक्ष विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं. ते आज नागपूर विधानभवनात आयोजित संसदीय अभ्यासवर्गात बोलत होते. ‘संसदीय लोकशाहीत सत्तारूढ तसंच विरोधी पक्षाचं स्थान आणि भूमिका’ या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केलं.

---------------------------------

**नक्षली आत्मसमर्पण**

विविध हिंसक घटनांमध्ये सहभागी राहिलेल्या ११ नक्षल्यांनी आज पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासमोर गडचिरोली इथं आत्मसमर्पण केलं. या सर्वांवर एकूण ८२ लाख रुपयांचं बक्षीस होतं. आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षल्यांमध्ये २ विभागीय समिती सदस्य, ३ पीपीसीएम, २ एसीएम आणि ४ दलम सदस्यांचा समावेश आहे. गडचिरोली पोलिस आणि सीआरपीएफच्या एकत्रित प्रयत्नांमुळे २०१५ पासून आतापर्यंत एकूण ११२ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. शासनाने २००५ पासून जाहीर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे आणि पोलिस दलानं केलेल्या पुनर्वसनामुळे आजपर्यंत एकूण ७८३ माओवाद्यांनी गडचिरोली पोलिस दलासमोर आत्मसमर्पण केलं आहे.

***(होल्ड बाईट - रश्मी शुक्ला - ३३ सेकंद)***

*महाराष्ट्रात आमचा प्रयत्न चालू आहे. नक्षलवाद गडचिरोलीत जवळजवळ संपुष्टात येत आहेत आणि आमच्या प्रयत्न की जे काय शिल्लक आहे त्यांना मी आत्मसमर्पण करून किंवा जे काही शक्य होईल आणि त्यापूर्वी नक्षलवाद संपुष्टात आणण्याचा प्रयत्न आता गडचिरोली कॉन्फ्लिक्ट एरियातून डेव्हलपमेंट एरियाकडे जात आहे. शासनाकडून बससेवा सुरु झाली आहे त्याचा परिणाम लोकांवर चांगला झाला आहे आणि तिथे शिक्षण आणि त्यांच्या ज्या एसुमलेशन आहे त्या मोठ्या प्रमाणात सुरु झाल्या आहेत*

याप्रसंगी पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या हस्ते भूपतीच्या आत्मसमर्पणात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या विशेष अभियान पथकातील अधिकारी आणि जवानांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गडचिरोली पोलिस दलाच्या वतीनं संकलित करण्यात आलेल्या 'प्रोजेक्ट उडान- वेध विकासाचा शासकीय योजना मार्गदर्शिका' या पुस्तकाचं अनावरण करण्यात आल

---------------------------------

**ड्रग्ज**

वर्ध्याजवळ कारंजा घाडगे इथं एका बेकायदा मेफेड्रॉन उत्पादन केंद्रावर छापा टाकून १९२ कोटी रुपये किंमतीचे १२८ किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. हे पदार्थ तयार करण्यासाठी वापरली जाणारी रसायनं आणि सामग्रीही जप्त करण्यात आली. महसूल गुप्तहेर संचालनालयानं केलेल्या या कारवाई प्रकरणी तीन जणांना ताब्यात घेण्यात आलं.

---------------------------------

**हवामान**

नागपूर, वर्धा, गोंदिया, आणि यवतमाळ जिल्ह्यात आज थंडीच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गोंदिया जिल्ह्यात उद्याही हा अलर्ट कायम राहणार आहे. नागपूर जिल्हा विदर्भात सर्वाधिक थंड ठरला असून इथं ८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ गोंदिया इथं 8.4, यवतमाळ इथं 8.8, तर वर्धा इथं 9.5 दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील तापमान 10 ते 12 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी 14 तारखेपर्यंत वातावरण शुष्क राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवला आहे.

---------------------------------

**एसटी 'पॅकेज टूर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) च्या 'पॅकेज टूर' उपक्रमानं अवघ्या सहा महिन्यांत नवा इतिहास रचला आहे. या योजनेला जनतेचा अफाट प्रतिसाद मिळत असून, एप्रिल २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यभरात तब्बल ४ हजार ३९ पॅकेज टूर यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आल्या आहेत.या कालावधीत एसटीच्या बसेसनं सुमारे २६.९७ लाख किलोमीटरचा प्रवास करत १९.२४ कोटी रुपयांचं उत्पन्न मिळवलं आहे.

---------------------------------